# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## विशेष फेरी-४ प्रसिध्दी निवेदन

दि.०९.०९.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत.

विशेष फेरी-४ ची गुणवत्ता यादी शुक्रवार दि ०९.०९.२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता प्रसिध्द करण्यात येणार आहे. या यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश वेळापत्रकानुसार शनिवार दि. १०.०९.२०१६ सकाळी ८.०० वाजलेपासून, व सोमवार दिनांक १२.०९.२०१६ व बुधवार दि.१४.०९.२०१६ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.

विशेष फेरी -४ मधील प्रवेशाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ. .क्र. | शाखा | एटीकेटी प्राप्त अर्ज | मागील व पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी अर्ज | एकुण अर्ज | एटीकेटी ॲलोकेशन | मागील व पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी ॲलोकेशन | एकुण ॲलोकेशन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कला (मराठी) | २९१ | २७९ | ५७० | २९१ | २७९ | ५७० |
| २ | कला (इंग्रजी) | २८ | ७१ | ९९ | २८ | ७१ | ९९ |
| ३ | कॉमर्स (मराठी) | ११९ | ३१३ | ४३२ | ११९ | ३१३ | ४३२ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | १३७ | ६३५ | ७७२ | १२० | ५९५ | ७१५ |
| ५ | विज्ञान (इंग्रजी) | १९ | ५०३ | ५२२ | १९ | ५०३ | ५२२ |
| | एकुण | ५९४ | १८०१ | २३९५ | ५७७ | १७६१ | २३३८ |

विशेष फेरी-४ मधील ॲलोकेशन झालेल्या एटीकेटी ५७७ विद्यार्थ्यांपैकी पहिल्या पसंती क्रमांकाचे ३६४ व दुस-या पसंतीक्रम-८० विद्यार्थी व पुरवणी परीक्षा व पुर्वीच्या उत्तीर्ण एकुण १७६१ विद्यार्थ्यांपैकी १०५२ विद्यार्थ्यांना पहिल्या व ३०६ विद्यार्थ्यांना दुस-या पसंती क्रमांकाचे कनिष्ठ महाविद्यालये मिळालेले आहेत.

### विशेष फेरी-४ मधील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) इ. ११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म क्रमांक टाकुन कोणते कॉलेज मिळाले आहे ते पाहावे.

२) विशेष फेरी-४ मधील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे महाविद्यालयात सादर करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावा. (शनिवार दि. १०.०९.२०१६ सकाळी ८.०० पासून , व सोमवार दिनांक १२.०९.२०१६ व बुधवार दि.१४.०९.२०१६ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत प्रवेश घ्यावेत.) कोणत्याही परिस्थितीत वेळ वाढवून दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३) इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाच्या पाच व चार विशेष फे-या घेण्यात आलेल्या आहेत, विशेष फेरी-४ या फेरीत ॲलोकेशन मिळालेल्या विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयात आपला प्रवेश अंतिम करावा. प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ दाखल्याची नोंद महाविद्यालयांनी आपल्या जनरल रजिस्टर मध्ये करावी. व संपुर्ण शुल्क स्विकारुण प्रवेश अंतिम करावा.

४) विशेष फेरी-५ मध्ये सहभागी होणा-या एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी व नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरी-५ च्या अगोदर पालक व विद्यार्थ्यांसाठी इ.११वी ऑनलाईन केंद्रीय नियंत्रण समितीने मार्गदर्शनपर वर्ग घेण्याचे ठरविले आहे. सदर मार्गदर्शनपर वर्ग एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर पुणे या ठिकाणी शनिवार दि.१७.०९.२०१६ व सोमवार दि.१९.०९.२०१६ वेळ सकाळी ११.०० वाजता घेण्यात येणार आहे. तरी सदर मार्गदर्शनपर वर्गाचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा. व इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाची विशेष फेरी-५ चे सविस्तर वेळापत्रक दि.१७.९.२०१६ रोजी जाहिर केले जाईल.

सदरचे प्रसिध्दीपत्रक इ. ११वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१